५१२३

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी — ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ , फॅक्स्-०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ११६५ **विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक :** ०१ / ११ / २०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील प्रभाग क्र. ५३ मधील वृंदावन गार्डनच्या मागील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील प्रभाग क्र. ५३ मधील वृंदावन गार्डनच्या मागील रस्ता अतिशय नादुरूस्त अवस्थेत असल्यामुळे तेथे रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. तशी मागणी तेथील स्थानिक नागरीकांनी केली असून त्यानुसार सदर कामाचे रू.४,९८,४७८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचे स्वरूप /अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील प्रभागक्र. ५३ मधील वृंदावन गार्डनच्या मागील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रस्त्याची लांबी — ४५.१० मी. रूंदी. ४.९५ मी. , Grade –I, Grade-II, B.B.M., Tack Coat, B.M.,B.C. रू. ४,९८,४७८/- |

याकरिता वर नमुद करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा दरसुची नुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे.

ठराव :- उपरोक्त् नमुद कामाच्या रक्कम रू. ४,९८,४७८/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी घेवून पुढील निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देण्यात येत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305**
**दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107**
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ११६६ **विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक :** ०१ / ११ / **२०२२**

---

प्रस्तावाचा विषय : वसई- विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प) येथील चक्रेश्व्रर तलावाचे सुशोभिकरण करणे व कारंजे बसविणे.

प्रस्तावाचा मजकूर : वसई- विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प) येथील चक्रेश्व्रर येथे तलाव अस्तित्वात असून सदर तलाव सूशोभिकरण करणे आवश्यक आहे. तरी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या शहर सौंदर्यीकरण कार्यक्रमाच्या अनुषंगाने सदर तलाव सुशोभिकरण केल्यास सदर तलाव व परिसर सुंदर व सुबक दिसेल. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम : रू. ५९,३०,५४५ /-

दरसुची : २०२१-२२

कामाचे स्वरूप : Scrapping, Apex Ultima,Steel Grill,M-१५,१०Hp pump, waterproof LED, Pannel Box,Stainless Steel applying oil paint

मालकी : व.वि.श.म.

विकास आराखडयातील आरक्षण : अ) लेखाशिर्ष - विकास निधी अंतर्गत इतर विकास कामे
ब) मुळतरतुद- रू.७,००,००,०००/-
क) शिल्ल्क - रू. ६१,१०,५१४/-
ड) तरतुद नियंत्रण नोंदवही क्र. ०१ पृ. क्र. ६९ अं. क.१३

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प) येथील चक्रेश्वर तलावाचे सुशोभिकरण करणे व कारंजे बसविणे कामी रक्कम रू. ५९,३०,५४५ /- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहेत. तसेच त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
व. वि.श.म.

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी – २०२०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ११६७ | विभाग : लेखापरीक्षण
दिनांक :07/11/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील वार्षिक लेख्यांचे (ताळेबंदपत्रक, उत्पन्न व खर्च विवरणपत्र, रोख प्रवाह विवरणपत्र, जमा व प्रदान विवरणपत्र व इतर सहपत्रे) लेखापरीक्षण करणेकामी सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर:-** महाराष्ट्र शासन, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य कोकण भवन, नवी मुंबई यांचे दि.२१ जुलै, २०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०५ व १०६ च्या तरतूदीनुसार व राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिका (NMAM) २००४ मधील परिशिष्ट १ मधील नमुने व नोंदवह्या, तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९४(१) मध्ये आयुक्ताने प्रत्येक एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरात लवकर मागील सरकारी वर्षातील परिवहन उपक्रमाच्या प्रशासनाव्यतिरिक्त शहरातील नगरपालिकेच्या अन्य प्रशासनासंबंधी तपशीलवार अहवाल व उक्त वर्षात नगरपालिका निधीच्या जमा झालेल्या व संवितरीत केलेल्या रकमा व अशा वर्षाच्या अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शविणाऱ्या विवरणपत्रासहित तयार करून स्थायी समितीस सादर केला पाहिजे, असे नमूद आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०६(३) मध्ये प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने, महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर केला पाहिजे, असे नमूद आहे.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, परिपत्रक लेखाप/२०१६/सं.क्र.२५४/न.वि.३१, दिनांक १८/०६/२०१६ नुसार महानगरपालिकांनी त्यांचे मुख्य लेखापरीक्षक (MCA) यांच्याकडून तपासणी झाल्यानंतर असे वार्षिक लेखे व ठराव मा. स्थायी समिती पुढे ठेवून त्यास मंजूरी घेणे अपेक्षित आहे व असे मंजूरी मिळालेले वार्षिक लेखे व ठराव स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाच्या महानगरपालिका लेखापरीक्षा विभागास प्रमाणिकरणासाठी सादर करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिका (NMAM) २००४ तरतूदींनुसार तयार करण्यात आलेल्या खालील विवरणपत्रांचे लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे.

१. ताळेबंदपत्रक (Balance Sheet),

२. उत्पन्न व खर्च विवरणपत्र (Income and Expenditure Statement),
३. रोख प्रवाह विवरणपत्र (Statement of Cash Flows),
४. जमा व प्रदाने विवरणपत्र (Receipts and Payments Account),
५. लेख्यांवरील भाष्य (Notes to Accounts),
६. वित्तीय कार्यक्षमतेबाबतचे निर्देशक (Financial Performance Indicators),
७. कायद्यानुसार स्थापित केलेले विविध निधींचे लेखे उदाहरणार्थ, वृक्ष प्राधिकरण निधी, आग सुरक्षा निधी व अनुषंगिक निधींचे लेखे,
८. राष्ट्रीय व लेखा नियमपुस्तिका (NMAM) २००४ मधील परिशिष्ट १ मधील नमुने व नोंदवह्या.

९. उपरोक्त वार्षिक लेखे खालील मार्गदर्शक सूचनांनुसार तयार करण्यात आले असल्याबाबत लेखापरीक्षणात तपासणी करणे आवश्यक आहे.
१०. महानगरपालिकेने केलेल्या गुंतवणूका व त्यानुषंगाने ठेवण्यात आलेले अभिलेखे/नोंदवह्या याची विवरणपत्रे.
११. वित्तीय वर्षाअखेरीस प्राप्त झालेल्या अनुदानाच्या रक्कमा खर्च न करता त्याचे ठेवीत रुपांतर केले असल्यास त्याची कारणे व तपशिल
१२. वार्षिक लेख्यात लेखाशिर्ष निहाय दर्शविलेल्या खर्च रक्कमा खर्चाच्या वर्गीकरण नोंदवहीसोबत जुळत नसल्यास त्याची सविस्तर कारणे.
१३. केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा तपशील व खर्चाच्या अनुषंगाने उपयोगिता प्रमाणपत्र.
१४. शासन अनुदान अखर्चित रक्कमा शासनास परत केल्याचा तपशील, परत केला नसल्यास त्याची सविस्तर कारणे.
१५. स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत प्राप्त खासदार निधी, आमदार निधीच्या रक्कमांचा वापर पूर्णपणे केल्याचे प्रमाणपत्र वापराविना पडून असल्यास त्याची कारणे.
१६. विविध राखीव निधी याबाबतीत केलेली तरतूद आणि खर्च. कमी/जादा खर्चाबाबतची कारणे.
१७. महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवहारासाठी उघडण्यात आलेल्या एकूण बँक खात्याचा ताळमेळ प्रमाणपत्रासह तपशील, उणे शिल्लक असलेल्या खात्याचा तपशिल, अनावश्यक बँक खात्याचा तपशिल सादर करावा.
१८. महसुली जमा/खर्च व भांडवली जमा/खर्च यांचे योग्य वर्गीकरण विवरणपत्र.

१९. अंदाजपत्रकातील मंजूर तरतूदीपेक्षा कमी/जादा केलेल्या खर्चाच्या अनुषंगाने पुनर्विनियोजन मंजूरी ठरावाचे आदेश.

२०. महानगरपालिका/परिवहन मंडळ यांना प्राप्त वित्तप्रेषण/अनुदान यांच्या सर्व नोंदी वार्षिक लेख्यात समाविष्ट केल्याचे प्रमाणपत्र.

२१. महानगरपालिका परिवहन मंडळ यांनी घेतलेले परतावे/कर्जाची परतफेड यांच्या नोंदीची विवरणपत्रे.

२२. महानगरपालिका/परिवहन मंडळ यांनी दिलेल्या अग्रिम रकमांचे वेळीच समायोजन/वसुली केली आहे का? अग्रिम नोंदवहीत सर्व प्रकारची अग्रीमे नोंदली आहेत का? नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

२३. महानगरपालिका/परिवहन मंडळ घसारा निधीचे विवरणपत्र.

२४. नगरविकास विभाग शासन, परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३४/नवी२०/दिनांक ०६/०२/२०१६ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार प्राप्त झालेल्या कर्ज रक्कमांच्या परतफेडीचे विवरणपत्र.

२५. मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम ६० तसेच महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका खंड ०१ मधील नियम क्रमांक १४८ नुसार शासनाला येणे असलेल्या रकमेच्या वसुलीचा ताळमेळ (वसूलपात्र रक्कम, वसूल केलेली रक्कम (शासन खाती भरल्याची चलने), वसुली न करण्याची कारणे, महानगरपालिकेचा हिस्सा ईत्यादी).

सदरचे द्विनोंद लेखापध्दतीचे वार्षिक लेखे तपासणी करणेकरिता लेखापरीक्षण विभागामध्ये अनुभवी अधिकारी/कर्मचारी यांची कमतरता असल्याने व विभागावर पूर्व लेखापरीक्षणासह इतर कामाचा अत्यंतिक भार असल्याने सदर कामी सनदी लेखापालाची नेमणूक करणे आवश्यक आहे.

सदर सनदी लेखापाल नेमणेकामी अंदाजित रक्कम रु.१० लक्ष इतका खर्च अपेक्षित असून "सामान्य प्रशासन द्विनोंद लेखा पध्दती अंमलबजावणीसह सनदी लेखापाल खर्च" या लेखाशिर्षांतर्गत रक्कम रु.२.५० कोटी इतक्या मूळ तरतूदीमधून सदरचा होणारा खर्च भागविता येईल.

महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. भां.ख.स. २०१४/प्र.क्र.८२/भाग-१११/उद्योग-४ दि.०१/१२/२०१६ रोजीच्या सुधारीत खरेदी धोरण नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.३.२.३ मधील दरपत्रकाच्या आधारे खरेदीच्या मर्यादा रु.३ लाखावरुन १० लाखापर्यंत महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. भां.ख.स. २०२१/प्र.क्र.८/उद्योग-४ दि.०७/०५/२०२१ अन्वये सुधारणा करण्यांत आलेली आहे.

तरी सदर कामी सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील राष्ट्रीय लेखा नियमपुस्तिका, २००४ नुसार द्विनोंद लेखापध्दतीचे वार्षिक लेख्यांचे लेखापरीक्षण करणेकामी सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणेकामी प्रशासकीय मंजुरीस्तव व दरपत्रक प्रक्रिया करणेस सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

**निर्णय :-**

सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील वार्षिक लेख्यांचे लेखापरीक्षण करणेकामी सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणेकामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.१० लक्ष पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर कामी दरपत्रक प्रक्रिया करण्यात यावी.

१७/१०

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ११६८

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- ०१ / ११ / २०२२

---

**विषय** :- सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षात बोअरवेल देखभाल - दुरूस्ती कामी आवश्यक साहित्य अवजारे खरेदी करणे कामी येणा-या अपेक्षित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**अंदाजीत रक्कम** :- **रू. ७५,००,०००/-**

| वर्षे | रक्कम रु. |
|---|---|
| सन २०२२-२३ | २५ लक्ष |
| सन २०२३-२४ | २५ लक्ष |
| सन २०२४-२५ | २५ लक्ष |

**कामाची आवश्यकता** :- वसई विरार शहर महानगरपालिकाक्षेत्रातील बोअरवेल - देखभाल दुरुस्तीची कामे खात्यामार्फत करण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी ठराव क्र. १८३, दि. २८/१०/२०२० अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली असून त्यानुसार बोअरवेल देखभाल दुरुस्तीकामी पथक स्थापन करुन देखभाल दुरुस्तीची कामे महानगरपालिकेमार्फत दुरुस्ती पथकामार्फत सुरु आहेत. सदर कामी सन २०२०-२१ व २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरीता दरपत्राव्दारे रक्कम रु. ५०,००,०००/- पर्यंत आवश्यक साहीत्य मागवून त्याव्दारे देखभाल दुरुस्तीची कामे सुरु आहेत.

महापालिका क्षेत्रात सुमारे १३७२ इतक्या बोअरवेल असुन बोअरवेल देखभाल दुरुस्ती पथकामार्फत बऱ्याच पुर्णपणे नादुरुस्त, बंद असलेल्या बोअरवेल पुर्णपणे दुरुस्ती करुन वापरण्या योग्य केलेल्या आहेत. नागरीक बोअरींगच्या पाण्याचा वापर सतत होत असल्याने बोअरवेल मध्ये बिघाड होतात. सदर बोअरवेल खात्यामार्फत दुरुस्तीची कामे करुन घेण्यात येत आहेत. सद्यस्थितीत सदर साहित्य खरेदी कामाच्या ठेक्याची मुदत संपृष्ठात आली असून आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी कामी बी/२ प्रकारची निविदा मंजूर असणे आवश्यक आहे. (साहित्याचा तपशिल सोबत जोडला आहे.)

सदर कामी सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ करीता ठेकेदाराची नियुक्ती करणे आवश्यक असून सन २०२२-२३ मध्ये रु. २५ लक्ष, २०२३-२४ मध्ये रु. २५ लक्ष व सन २०२४-२५ करिता रु.२५ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा प्रस्तावित **"बोअरवेल दुरुस्ती व दुरुस्तीसाठी साहित्य खरेदी"** या लेखाशिर्षाअंतर्गत तरतुदी मधून भागविणे शक्य आहे.

तरी विषयांकीत कामासाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी बी/२ प्रकारची निविदा मागविण्यास व खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे.

---

**ठराव / निर्णय :-** १) सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षात बोअरवेल देखभाल - दुरूस्ती कामी आवश्यक साहित्य अवजारे खरेदी करणे कामी रु. ७५,००,०००/- खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

२) सदर कामाची बी/२ प्रकारची ई - निविदा मागविण्यास व त्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

१८/१०

**(अनिलकुमार पवार)**
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ११६८ **विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक :** ०१ /११ / **२०२२**

---

| | | |
|---|---|---|
| प्रस्तावाचा विषय | : | वसई- विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प) पाटणकर पार्क सिग्नल येथे चौक उभारणे. |
| प्रस्तावाचा मजकूर | : | वसई- विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प) पाटणकर पार्क सिग्नल येथे ३० मी. डी.पी रोड असून त्याठिकाणी वाहतूकीची प्रचंड वरदळ असल्याने मध्यभागी चौक करणे आवश्यक आहे. तरी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या शहर सौंदर्यीकरण कार्यक्रमाच्या अनुषंगाने सदर ठिकाणी मध्यभागी चौक केल्यास वाहतूकीबाबतची समस्या दूर होईल व सदर परिसर सुंदर व सुबक दिसेल. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| अंदाजपत्रकीय रक्कम | : | रू. १३,०४,५११/- |
| दरसुची | : | २०२१-२२ |
| कामाचे स्वरूप | : | Excavation,Rubble Soling,M-१५,M-२० R.C.C work |
| मालकी | : | व.वि.श.म. |
| विकास आराखडयातील आरक्षण | : | अ) लेखाशिर्ष - विकास निधी अंतर्गत इतर विकास कामे |
| | - | ब) मुळतरतुद- रू.७,००,००,०००/- |
| | | क) शिल्ल्क - रू.१,२०,४१,०५९/- |
| | | ड) तरतुद नियंत्रण नोंदवही क्र. ०१ पृ. क्र.६८ अं. क.१२ |

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प) पाटणकर पार्क सिग्नल येथे चौक उभारणे कामी रक्कम रू. १३,०४,५११/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहेत. तसेच त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
व. वि.श.म.

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं – ४०१३०५
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल –vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ११७०

विभाग : बांधकाम
दिनांक : १/११/२०२२

१) प्रस्तावाचा विषय : वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील तामतलावास रंगकाम करणे, झाडांना पार बांधणे व फाऊटंनचे विद्युतीकरण करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकीय रक्कम : रु. ३७,४७,९८३/-

३) कामाची आवश्यकता : शासन निर्णय क्र. स्वमअ/२०२२/प्र.क्र. १२६/नवि-३४ दि. ३०/०९/२०२२ रोजी नुसार शासनाने २ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत सौदर्यकरण व स्वच्छतेबाबत ९० दिवसाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. त्यानुसार शहर सौदर्यकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२ आयोजित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने शहरातील तलाव सुशोभिकरण करणे देखील स्पर्धेचा एक घटक असल्याने आयुक्त सो यांनी प्रभाग समिती आय मधील कार्यक्षेत्रातील तामतलावास रंगकाम करणे व फाऊटंनचे विद्युतीकरण करणे सुशोभिकरण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार प्रभाग समिती आय मधील तामतलावाची प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन संरक्षक भिंतीस व संरक्षक जाळीस रंगकाम करणे व फाऊंटनला विद्युतीकरण करणे या कामाकरीता रक्कम रु. ३७,४७,९८३/- अंदाजपत्रक बनवण्यात आलेले आहे.

४) कामाचे स्वरुप : अंतर्गत कामे : रंगकाम करणे व विद्युतीकरण
परिमाण : रंगकाम – २३०१.५५ चौ.मी.
१२६७.३३ चौ.मी.
पेव्हर ब्लॉक दुरुस्ती – ४५५.०० चौ.मी.
रेलिंग – ४०.३२ चौ.मी.
वीट बांधकाम – ३७२ मी.
झाडांना पार – ३२ नग

५) यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- निरंक

६) जागेची मालकी : महानगरपालिका

७) विकास आराखडयातील आरक्षण :

८) अर्थसंकल्पीय तरतुद : अ) लेखाशिर्ष : राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना अनुदानासह महानगरपालिका अंशदानातुन तलाव सुशोभिकरण करणे.

९) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. ३३ अ.क्र. ३०१ वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव : वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील तामतलावास रंगकाम करणे, झाडांना पार बांधणे व फाऊटंनचे विद्युतीकरण करणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३७,४७,९८३/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

प-२८

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५**
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ११७०१

विभाग : बांधकाम
दिनांक :०७/११/२०२२

---

१) प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील बाभोळा नाका ते पापडी पोलिस चौकी पर्यंत फुटपाथ दुरुस्ती करणे तसेच डिव्हायडर, विद्युत खांबास रंगकाम करणे व झाडांस पार बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकिय रक्कम :- रु. ३४,१४,५७८/-

३) प्रस्तावाची गरज :- शासन निर्णय क्र. स्वंमअ-२०२२/प्र.क्र.१२६/नवि-३४ दि. ३०/०९/२०२२ रोजी नुसार शासनाने २ ऑक्टोंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत सौदर्याकरण व स्वच्छतेबाबत ९० दिवसाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. त्यानुसार 'शहर सौदर्याकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२' आयोजित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने शहरातील प्रमुख रस्त्यावरील फुटपाथ, डिव्हायडर व लगतची झाडे यांस पार बांधुन रंगकाम करणे करणे हा देखिल स्पर्धाचा एक घटक असल्याने मा. आयुक्त सो. हयांनी प्रभाग समिती आय मधील बाभोळा नाका ते पापडी पोलिस चौकी पर्यंत फुटपाथ दुरुस्ती करणे तसेच डिव्हायडर, विद्युत खांबास व रंगकाम करणे व झाडांस पार बांधणे करणेचे निर्देश दिले आहेत. तसेच मुख्य रस्त्याच्या दोन्ही साईडला असलेले फुटपाथ दुरुस्ती करुन रंगरंगोटी करणे व अस्तित्वात असलेली झाडे तसेच विजेचे खांबांची रंगरंगोटी करणे आवश्यक आहे.

त्यानुसार सदर कामाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन रक्कम रु. ३४,१४,५७८/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे.

४) कामाचे स्वरुप :- अंतर्गत कामे :- फुटपाथ दुरुस्ती, रंगकाम, पार बांधणे.
परिमाण :- रंगकाम -३९३० चौ.मी
पेव्हर ब्लॉक — १६८ चौ.मी.
लादी बसविणे — १०२ चौ.मी.

५) यापूर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- निरंक

६) जागेची मालकी :- महानगरपालिका

७) विकास आराखडयातील आरक्षण :- -

८) अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखाशिर्ष -

९) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. ३३ अ.क्र. २९६ वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील बाभोळा नाका ते पापडी पोलिस चौकी पर्यंत फुटपाथ दुरुस्ती करणे तसेच डिव्हायडर, विद्युत खांबास रंगकाम करणे व झाडांस पार बांधणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३४,१४,५७८/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५**
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ११७०२

विभाग : बांधकाम
दिनांक : ०७/११/२०२२

---

| | | |
|---|---|---|
| १) प्रस्तावाचा विषय | :- | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील बाभोळा नाका ते पापडी पोलिस चौकी पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे व दिशादर्शक लावणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| २) अंदाजपत्रकिय रक्कम | :- | रु. २,७८,७३,००३/- |
| ३) प्रस्तावाची गरज | :- | शासन निर्णय क्र. स्वंमअ-२०२२/प्र.क्र.१२६/नवि-३४ दि. ३०/०९/२०२२ रोजी नुसार शासनाने २ ऑक्टोंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत सौदर्याकरण व स्वच्छतेबाबत ९० दिवसाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. त्यानुसार 'शहर सौदर्याकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२' आयोजित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने शहरातील प्रमुख रस्ते सुशोभीकरण करणे देखील स्पर्धेचा एक घटक असल्याने मा. आयुक्त सो यांनी प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील बाभोळा नाका ते पापडी पोलिस चौकी पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे व दिशादर्शक लावणे सुशोभीकरण करण्याचे निर्देश दिले आहेत. परंतु सदर रस्त्यावर पावसाळयाच्या दिवसात पडलेले तसेच पाण्याच्या गळतीमुळे झालेले खड्डे पेव्हर ब्लॉकने व डांबराने भरण्यात आलेले आहे. परंतु दरवर्षीच्या खड्डे भरण्याने रस्त्याचा भाग मोठया प्रमाणावर असमांतर व बऱ्याच ठिकाणी केंबर नाहीसे झालेले आहेत. त्यानुसार सदर रस्त्याची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन रक्कम रु. २,७८,७३,००३/- अंदाजपत्रक बनवण्यात आलेले आहे. |
| ४) कामाचे स्वरुप | :- | अंतर्गत कामे :- रस्त्याचे रिसर्फेसींग रसता खडीकरण डांबरीकरण — (ग्रेड-I, ग्रेड-II) MPM टॅक कोट, BM, BC रस्ता फर्निचन — दिशा दर्शके, मिडीयन मार्कर<br>परिमाण :- खडीकरण १५३६ मी., रुंदी ९ मी. डांबरीकरण २९८६ मी., रुंदी ९ मी. |

५) यापूर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- निरंक

६) जागेची मालकी :- महानगरपालिका

७) विकास आराखडयातील आरक्षण :- -

८) अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखाशिर्ष - इतर विकास कामे

९) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. ३३ अ.क्र. २९८ वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील बाभोळा नाका ते पापडी पोलिस चौकी पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे व दिशादर्शक लावणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,७८,७३,००३/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई विरार शहर महानगरपालिका**
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं — ४०१३०५
दूरध्वनी — ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स — ०२५०-२५२५१०७
ई-मेल —vasaivirarcorporation@yahoo.com



प्रशासकीय ठराव क्र. ११७०३

विभाग : बांधकाम
दिनांक :०१/११/२०२२

१) प्रस्तावाचा विषय : वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११० मधील तामतलाव क्लब हाऊस ते मुख्य रस्त्यापर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे व उंच जलकुंभाखालील (ESR) जागेवर काँक्रीटीकरण करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकीय रक्कम : रु. ६३,६१,३१८/-

३) कामाची आवश्यकता : वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रत तामतलाव येथे पाण्याच्या टाकीजवळ महानगरपालिका मालकीचा जलतरण तलाव आहे. सदर जलतरण तलावाच्या सुविधेचा लाभ घेण्यासाठी अनेक नागरिकांनी नोंदणी केली असुन दररोज येथे पोहण्यासाठी अनेक नागरीक येत असतात. सदर ठिकाणी येण्यासाठी असलेला रस्ता कच्च्या स्वरुपाचा असुन त्यामुळे पावसाळयात येथे येणा-या नागरीकांची गैरसोय होते. याबाबत अनेक नागरीकांच्या तसेच सन्माननीय सदस्यांच्या मौखिक तक्रारी या कार्यालयात प्राप्त होत असुन सदर रस्त्याचे काम हाती घेणेबाबत मागणी होत आहे. अग्निशमन विभागाच्या तसेच जलतरण तलावावर येणाऱ्या नागरीकांच्या गाडया पार्किंग करण्याची सोय व्हावी या दृष्टीने रस्त्यालगतच्या उंच जलकुंभाखालील जागेत काँक्रीटीकरण करणे गरजेचे आहे. तरी वस्तुस्थिती लक्षात घेता सदर काम हाती घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने पाहणी करुन अंदाजपत्रक तयार केले आहे.

४) कामाचे स्वरुप : अंतर्गत कामे : खोदाई, खडीकरण : ग्रेड-१, ग्रेड-२,
डांबरीकरण : MPM, Tack Coat, BM, BC
काँक्रीटीकरण : PCC-M१०, PCC-M१५
परिमाण : लांबी ८०.०० मी., रुंदी ५.०० मी.
लांबी ३०.०० मी., रुंदी २०.०० मी.
एकुण क्षेत्रफळ = ९००.०० चौ.मी.
काँक्रीटीकरण = लांबी ३०.०० मी., रुंदी २५.०० मी.

५) यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- यापुर्वी सदर ठिकाणी मागील ३ वर्षात कुठल्याही प्रकारची कामे झालेले नाही.

६) जागेची मालकी : व.वि.श.म

७) विकास आराखडयातील आरक्षण : वहिवाटीचा रस्ता

८) अर्थसंकल्पीय तरतुद : अ) लेखाशिर्ष : रस्ता बांधकामे

९) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. ३१ अ.क्र. २९ वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव : वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११० मधील तामतलाव क्लब हाऊस ते मुख्य रस्त्यापर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे व उंच जलकुंभाखालील (ESR) जागेवर कॉँक्रीटीकरण करणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६३,६१,३१८/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं — ४०१३०५
दूरध्वनी — ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स — ०२५०-२५२५१०७
ई-मेल —vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ११७४

विभाग : बांधकाम
दिनांक : ०७/११/२०२२

१) प्रस्तावाचा विषय : वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यालय इमारतीची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकीय रक्कम : रु. . ९,७७,४१४/-

३) कामाची आवश्यकता : महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये शहर स्थरावर शहर सौदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२ या वॉर्ड स्तरावर — वॉर्ड सौदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२ दि. २ ऑक्टोबर २०२२ ते दि. ३१ डिसेंबर २०२२ या कालावधी मध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. सदर स्पर्धेमध्ये वसई विरार शहर महानगरपालिकेने सहभाग घेतला असुन त्यास अनुसरुन आयुक्त महोदय यांनी दि. ०७/१०/२०२२ रोजी बैठक आयोजित करुन संबंधित प्रभाग समितीस शहर सुशोभिकरण करणे संदर्भात योग्य त्या सुचना दिलेल्या आहेत. प्रभाग समिती आय कार्यालय इमारतीची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे या कामाचे रक्कम रु. ९,७७,४१४/- इतक्या किंमतीचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करुन सादर करीत आहे. तसेच सदर ठिकाणी मागील ३ वर्षात काम करण्यात आलेले नाही.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन सन २०२१-२२ च्या राज्य दर सुचिवर आधारीत रु. ९,७७,४१४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदर खर्चास मा. सर्वसाधारण सभा/ मा. स्थायी समितीच्या मान्यतेची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत शासनाने महानगरपालिकेवर प्रशासकाची नेमणुक केली असुन आयुक्त हयांच्याकडे प्रशासक यांचे अधिकार आहेत.

सदर कामाचा खर्च २०२१-२२ व २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील बांधकाम विभाग, भांडवली खर्चामधील **'कार्यालय व समिती सभागृह नुतनीकरण'** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविणे शक्य आहे.

४) कामाचे स्वरुप : अंतर्गत कामे : प्लास्टर, रंगकाम, इमारत दुरुस्ती
परिमाण : प्लास्टर — २९.०६ चौ.मी.
रंगकाम — १८८६ चौ.मी.

५) यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- निरंक

६) जागेची मालकी : व.वि.श.म

७) विकास आराखडयातील आरक्षण :

८) अर्थसंकल्पीय तरतुद : अ) लेखाशिर्ष :

९) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. ३३ अ.क्र. २९९ वर नोंद

D:\PRABHAG I\WARD\Tipni\VIRAR\Office Building\Tharav.docx

तथापी सदर काम हे तातडीने करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन शुध्दिपत्रक क्र. सी.ए.टी. ०१/२०१५/प्र.क्र.२०/इमा-२ दि. २९/०७/२०२१ नुसार रु. १० लक्ष पर्यंतची कामे मंजुर सहकारी संस्था किंवा सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांच्यामार्फत मुभा देण्यात आलेली आहे.

तरी सदरचे काम मंजुर सहकारी संस्था किंवा सुशिक्षीत बेरोजगार अभियंता हयांचेकडुन करुन घेणेचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव : वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यालय इमारतीची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. . ९,७७,४१४/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे. तसेच सदरचे काम तातडीने करुन घ्यावयाचे असल्याने महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन शुध्दिपत्रक क्र. सी.ए.टी. ०१/२०१५/प्र.क्र.२०/इमा-२ दि. २९/०७/२०२१ नुसार रु. १० लक्ष पर्यंतची कामे मंजुर सहकारी संस्था किंवा सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांच्यामार्फत करुन घेण्याच्या कार्यवाहीस मान्यता देणेत येत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

D:\PRABHAG I\WARD\Tipni\VIRAR\Office Building\Tharav.docx

व/४८

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ११८७५

विभाग : बांधकाम
दिनांक : ०७/११/२०२२

---

१) प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वसई गांव बस डेपोजवळ ट्रफिक आईस लॅण्ड बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकिय रक्कम :- रु. ३६,७२,४१८/-

३) प्रस्तावाची गरज :- शासन निर्णय क्र. स्वंमअ-२०२२/प्र.क्र.१२६/नवि-३४ दि. ३०/०९/२०२२ रोजी नुसार शासनाने २ ऑक्टोंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत सौदर्याकरण व स्वच्छतेबाबत ९० दिवसाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. त्यानुसार 'शहर सौदर्याकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२' आयोजित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने शहरातील चौकामधील वाहतुके सुरक्षित नियमन करणे व चौक सुशोभिकरण करणे हा देखिल स्पर्धाचा एक घटक असल्याने मा. आयुक्त सो. हयांनी प्रभाग समिती आय मधील प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वसई गांव बस डेपोजवळ ट्रफिक आईस लॅण्ड बांधणेचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार प्रभाग समिती आय मधील चौकाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन ट्रफिक आईस लॅण्ड बांधणे या कामाकरीता रक्कम रु. ३६,७२,४१८/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे.

४) कामाचे स्वरुप :- अंतर्गत कामे :- पी.सी.सी, आर.सी.सी. परदी, स्टील, रेलिंग, माती भराव, ग्रेनाईट, लॉन

परिमाण :-
पी.सी.सी. — १.२७ घन. मी.
आर.सी.सी. परदी — २५.०४ घन. मी.
स्टील — १.२५ टन
रेलिंग — १९.६५ मी.
माती भराव — १६.४५ घन.मी.
ग्रेनाईट — २०.६३ चौ.मी.
लॉन — १०.७० चौ. मी.

५) यापूर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- निरंक

६) जागेची मालकी :- महानगरपालिका

७) विकास आराखडयातील आरक्षण :- -

८) अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखाशिर्ष - इतर विकास कामे

९) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. ३३ अ.क्र. ३०० वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वसई गांव बस डेपोजवळ ट्रफिक आईस लॅण्ड बांधणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३६,७२,४१८/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ११७८ विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : ०१/११/२०२२

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' मधिल विरार पूर्व वॉर्ड क्र.०७ मध्ये विरार (पू) साईनाथ नगर येथील चौकाचे सुशोभिकरण करणे कामी आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.४३,००,६४५/-

प्रस्तावाची गरज :- महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये शहर स्तरावर **"शहर सौंदर्याकीरण व स्वच्छता स्पर्धा २०२२"** व वॉर्ड स्थरातरावर "वॉर्ड सौंदर्याकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२" दि.२ ऑक्टोंबर २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधी मध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. सदर स्पर्धेमध्ये वसई -विरार शहर महानगरपालिकेने सहभाग घेतला असून त्यास अनुसरुन आयुक्त महोदय यांनी दि.७/१०/२०२२ रोजी बैठक आयोजित करुन संबंधित प्रभाग समितीस शहर सुशोभिकरण करणे संदर्भात सुचना दिलेल्या आहेत. सदर कामी रु.४३,००,६४५/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

कामाचे स्वरुप :- चौक सुशोभिकरण करणे

यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- सदर काम मागील ३ वर्षात झालेले नाही.

जागेची मालकी :- वसई-विरार शहर महानगरपालिका

विकास आराखडयातील आरक्षण :- --

तरी सरदचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६३ नुसार आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' मधिल विरार पूर्व वॉर्ड क्र.०७ मध्ये विरार (पू) साईनाथ नगर येथील चौकाचे सुशोभिकरण करणेकामी रक्कम रु.४३,००,६४५/- इतक्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६३ नुसार आयुक्त तथा प्रशासक हे प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत.तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यताघेवून निविदा मागविणेत याव्यात.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५

दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकीय ठराव क्र. ९७७७

विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : ०१/११/२०२२

प्रस्ताव विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' मध्ये शहर सुशोभिकरण करणेकरीता मनपा बहुउद्देशीय इमारतीस रंगरंगोटी करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.१६,९४,१२५/-

प्रस्तावाचा मजूर :- महाराष्ट्र शासनामार्फत राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य शहर स्तरावर शहर सौंदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२ " व वॉर्ड स्तरावर "वॉर्ड सौंदर्याकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२" दि. २ ऑक्टोबर २०२२ ते दि.३१ डिसेंबर २०२२ या कालावधी मध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. सदर स्पर्धेमध्ये वसई-विरार शहर महानगरपालिकेने सहभाग घेतला असून त्यास अनुसरुन मा.आयुक्त सो. हयांनी दि.७/१०/२०२२ रोजी बैठक आयोजित करुन शहर सुशोभिकरण करणेकरीता सुचना निर्गमित केल्या आहेत.

त्याअनुषंगाने शहर सुशोभिकरण करणेकरीता मनपा बहुउद्देशीय इमारतीस रंगरंगोटी करणेकामी बांधकाम विभागामार्फत चालू राज्य दरसूची सन २०२१-२२ नुसार रक्कम रु.१६,९४,१२५/-इतक्या किमतीचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. सदरचे काम मागील ३ वर्षात काम करण्यात आलेले नाही.

| कामाचे नाव | अंर्तभूत बाबी |
|---|---|
| शहर सुशोभिकरण करणेकरीता मनपा बहुउद्देशीय इमारतीस रंगरंगोटी करणे | स्क्रॅपींग, व्हाईट वॉश, रॉयल लक्झरी इमल्शल पेंट,एसीपी क्लॅडींग इ. |

सदर कामाचा खर्च सन २०२१-२२ व २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील बांधकाम विभाग, भांडवली खर्चामधीलकार्यालय व समिती सभागृह या लेखाशिर्षाअंतर्गत भागविणे शक्य आहे.

१. लेखाशिर्ष :- 'कार्यालय व समिती सभागृह'

२. मुळ तरतुद :- ५०,००,००,०००/-

३. या प्रस्तावाचा खर्च :- रु.१६,९४,१२५/-

४. यापुर्वीचा खर्च :- ५,९५,३८७/-

५. उपलब्ध शिल्लक :- ४,७७,१०,४८८/-

नियंत्रण नोंदवही क्र .०१, अ.क्र. ०३, पृष्ठ क्र. ४७ वर नोंद घेण्यात आलेली आहे.

तरी शहर सुशोभिकरण करणेकरीता मनपा बहुउद्देशीय इमारतीस रंगरंगोटी करणेकामी होणाऱ्या रक्कम रु.१६,९४,१२५/- खर्चास मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव :-** शहर सुशोभिकरण करणेकरीता मनपा बहुउद्देशीय इमारतीस रंगरंगोटी करणे कामी चालू दरसूची सन २१-२२ नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१६,९४,१२५/- किंमतीच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका ६३(क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र . ११७८      विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :०१/११/२०२२

प्रस्ताव विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' मध्ये शहर सुशोभिकरण करणेकरीता विरार पूर्व पश्चिम उड्डाणपूल व लिफ्टला रंगरंगोटी करणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.६७,७१,१७७/-

प्रस्तावाचा मजूर :- महाराष्ट्र शासनामार्फत राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य शहर स्तरावर शहर सौंदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२ " व वॉर्ड स्तरावर "वॉर्ड सौंदर्याकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२" दि. २ ऑक्टोबर २०२२ ते दि.३१ डिसेंबर २०२२ या कालावधी मध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. सदर स्पर्धेमध्ये वसई-विरार शहर महानगरपालिकेने सहभाग घेतला असून त्यास अनुसरुन मा.आयुक्त सो. हयांनी दि.७/१०/२०२२ रोजी बैठक आयोजित करुन शहर सुशोभिकरण करणेकरीता सुचना निर्गमित केल्या आहेत.

त्याअनुषंगाने शहर सुशोभिकरण करणेकरीता विरार पूर्व पश्चिम उड्डाणपूल व लिफ्टला रंगरंगोटी करणे कामी बांधकाम विभागामार्फत चालू राज्य दरसूची सन २०२१-२२ नुसार रक्कम रु.६७,७१,१७७/- इतक्या किमतीचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. सदरचे काम मागील ३ वर्षात काम करण्यात आलेले नाही.

| कामाचे नाव | अंर्तभूत बाबी |
|---|---|
| शहर सुशोभिकरण करणेकरीता विरार पूर्व पश्चिम उड्डाणपूल व लिफ्टला रंगरंगोटी करणे | स्क्रॅपींग, प्राइमर पेंट, ऑइल पेंट, आर्टिस्टीक पेंट इ. |

सदर कामाचा खर्च सन २०२१-२२ व २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील बांधकाम विभाग, भांडवली खर्चामधील 'शहराअंतर्गत उड्डाणपूल' या लेखाशिर्षाअंतर्गत भागविणे शक्य आहे.

१. लेखाशिर्ष :- 'शहराअंतर्गत उड्डाणपूल'

२. मुळ तरतुद :- २०,००,००,०००/-

३. या प्रस्तावाचा खर्च :- रु.६७,७१,१७७/-

४. यापुर्वीचा खर्च :- निरंक

५. उपलब्ध शिल्लक :- १७,३२,२८,८२३/-

नियंत्रण नोंदवही क्र .०१, अ.क्र. ०१, पृष्ठ क्र. ९९ वर नोंद घेण्यात आलेली आहे.

तरी शहर सुशोभिकरण करणेकरीता विरार पूर्व पश्चिम उड्डाणपूल व लिफ्टला रंगरंगोटी करणे कामी होणाऱ्या रक्कम रु.६७,७१,१७७/- खर्चास मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव** :- शहर सुशोभिकरण करणेकरीता विरार पूर्व पश्चिम उड्डाणपूल व लिफ्टला रंगरंगोटी करणे कामी चालू दरसूची सन २१-२२ नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.६७,७१,१७७/- किंमतीच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका ६३(क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पु) जि.पालघर, पिन.नं. ४०१ ३०५
दुरध्वनी क्र. ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६,फॅक्स- ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- **vasaivirarcorporation@yahoo.com**

---

प्रशासकीय ठराव क्र. ११७८

विभाग : बांधकाम

दिनांक : ०१/११/२०२२

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग समिती 'एच' वॉर्ड क्र.९६ मध्ये कामगार वसाहत दुरूस्ती करणे चे काम रद्द करणेंस मान्यता देणे.

